गीत ः मल्हारवारी | चित्रपट ः अगंबाई अरेच्चा

गायक ः शाहिर साबळे, अजय गोगावले | गीत ः शाहिर साबळे | संगीत ः अजय अतुल

मल्हार वारी मोतियानं दयावी भरून
न्हायतर देवा देवा मी जातो दुरून
ओढ लावती अशी जिवाला गावाकडची माती
साद घालती पुन्हा नव्याने ती रक्ताची नाती
मल्हार वारी मोतियानं दयावी भरून
न्हायतर देवा देवा मी जातो दुरून

ओ हो ओ हो ओ हो ओ हो
गड जेजुरीचे आम्ही रहिवाशी
हा गड जेजुरीचे आम्ही रहिवासी
देवाचा झेंडा वळखला दुरून
मोतियानं दयावी भरून
न्हायतर देवा देवा मी जातो दुरून
मल्हार वारी मोतियानं दयावी भरून
न्हायतर देवा देवा मी जाते दुरून
उधं उधं उधं उधं उधं उधं

उधे गं अंबे उधे
उधे गं अंबे उधे
होऊदे सर्व दिशी मंगळ
जडवितो रात्रंदिन संबळ
उधे उधे उधे उधे उधे उधे उधे
फुलवितो दिवटी दिपकळी
आम्ही अंबेचे गोंधळी

उधे गं अंबे उधे उधे गं अम्बे उधे

घरोघरी हिंडतो गोंधळ आईचा मांडतो

आईचा मांडितो नि गोंधळ देविचा मांडतो

भवानी भवानी भवानी बसती ओठी गळी

आम्ही अंबेचे गोंधळी

अंबेचे गोंधळी आम्ही अंबेचे गोंधळी आहा

उधे गं अंबे उधे ४

सान थोर नेणतो न आम्ही दैवाशी जाणतो

दैवाशी जाणतो आम्ही दैवाशी जाणतो

गावली गावली गावली मुळ मायेची मुळी

आम्ही अंबेचे गोंधळी

उधे गं अंबे उधे उधे गं अंबे उधे

बोला अंबाबाईचा उदो

रेणुकादेवीचा उदो

या एकविरा आईचा उदो

या आदीमायेचा उदो

जंगदंबेचा उदो

महालक्ष्मीचा उदो

सप्तश्रृंगीचा उदो

काळूबाईचा उदो

तुळजाभवानी आईचा उदो

बोला अंबाबाईचा उदो

रेणुकादेवीचा उदो

बोला जंगदंबेचा उदो